ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# एका तेजस्विनीची चित्तरकथा : मास्तरांची सावली

**डॉ. लक्ष्मण ना. वाघमारे**
*47A, वैभवनगर, तरोडा (बु.)*
*नांदेड ता. जि. नांदेड*

**प्रस्तावना :**

कोणत्याही भाषेचे भाषाशास्त्रीय वर्णन करतांना भाषेची दोन अंगे महत्वाची असतात. भाषा बोलणारा आणि भाषा बोलणारा. भाषा बोलणारा म्हणजे शब्दांग आणि भाषा ऐकणारा म्हणजे अर्थांग. शेकडो उच्चार आणि श्रुती यांच्यामधून साठच वर्ण भाषेसाठी उपलब्ध होतात. एका व्यक्तिने तिचा अनुभव दुसऱ्या व्यक्तिला समोरासमोर सांगणे. तर दुसऱ्या व्यक्तिने लिहून काढणे. यालाच शब्दांकन म्हणतात. लेखन करत असताना मात्र शब्द, वाक्यरचना आणि संवाद यांचा क्रम बदलून लेखनात वेगळा क्रम येतो. याच धरतीवर 'मास्तरांची सावली' हे आत्मचरित्र नेहा किशोर सावंत यांनी शब्दांकित केले आहे. हे पुस्तक २४८ पानांचे असून डिंपल पब्लिकेशन, ठाणे यांनी २०१८ साली प्रकाशित केले आहे. या पुस्तकाच्या एकूण सहा आवृत्त्या निघालेल्या आहेत. या पुस्तकाचे बलस्थान म्हणजे लेखिकेने शब्दांकनामध्ये कुठेही कृत्रिमपणा येऊ दिला नाही. प्रस्तुत पुस्तक शब्दांकित करण्याचे प्रयोजने लेखिकेने नोंदवलेले आहेत. त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सुधाकर पाटोळे नावाच्या मित्राने लग्नाच्या वाढदिवसाची भेट म्हणून माथेरानच्या निवास्थानाचं बुकिंग करून दिल्याचे त्या स्पष्ट करतात. तिथे भटकंती करताना '८ मार्च रोजी सुप्रसिद्ध कवी पद्मश्री नारायण सुर्वे यांची प्रकट मुलाखत' या शीर्षकाचा फलक पाहिल्याची त्या नोंद घेतात. विशेष म्हणजे १४ मार्च पर्यंत हा फलक पुसला गेला असल्याचे त्या सांगतात. त्यामुळे माथेरान मार्केटमधील शाळेतल्या एका शिक्षकाच्या मदतीने माहिती घेऊन श्री सुर्वे आणि सौ.सुर्व्यांना भेटण्याचा योग आल्याचे त्या नमुद करतात. कृष्णाबाई सुर्वे यांना समजून घेताना नेहा सावंत यांनी अजून एक अनुभव कथन केला आहे. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जीवनावर आधारित 'राष्ट्रपिता पुरस्कार विजेता नारायण गंगाराम सुर्वे'हा चित्रपट अरूण खोपेकर यांनी दिग्दर्शित केला आणि शांता गोखले यांनी लेखन केले. याच चित्रपटात नेहा सावंत यांनी कृष्णाबाईची भूमिका केली. त्यांच्या भूमिकेविषयी सुर्वे दाम्पत्यांची प्रतिक्रिया,

'आमचं तरुणपण तुम्ही जागं केलंत?' यावर नेहा सावंत यांनीही कृष्णाबाई सुर्वे यांना लिहिण्याविषयी प्रश्न केला. त्यावर कृष्णाबाई सुर्वे यांचं उत्तर,

''खूप वाटतं लिहावसं मनात सतत खळबळ चालू असते, पण लिहिणार कोण? मी बाई अडाणी, अशिक्षित. तसं वासंती मुझुमदारांनी माझ्यावर लिहिण्याची सुरूवातही केली होती. पण त्या गेल्या आणि सगळंच राहून गेले, आता इतक्या लांब कोण येणार हे काम करायला?'' त्याच क्षणी नेहा सावंत यांनी कृष्णाबाई सुर्वे यांच्या जीवनातील अनुभव शब्दबद्ध करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे 'मास्तरांची सावली' हे आत्मचरित्र त्यांच्या हातून प्रसवले.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. कृष्णाबाईंचा जीवनप्रवास समजून घेणे.
२. प्रस्तुत आत्मचरित्रातील सामाजिक जाणिवा शोधणे.

**साधनसामुग्री :**

१. संदर्भग्रंथ
२. इंटरनेट
३. वर्तमानपत्र
४. मासिक

**कृष्णाबाई सुर्वे यांचं खडतर बालपण :**

कृष्णाबाई सुर्वे यांचा जन्म एका गिरणी कामगार कुटुंबात झाला. परळच्या (मुंबई) वाडिया हॉस्पिटलमध्ये त्या जन्मल्या. आई वडील दोघेही मिल कामगार होते. मुरारजी (केळीची वाडी) मिलममध्ये वडील कामाला जात होते; तर आई मुंबईच्याच 'जपानच्या गिरणीत' कामाला होती. कृष्णाबाई सुर्वे यांचे वडील म्हणजे त्यांच्या आईचे आतेभाऊच होते. कृष्णाबाईंच्या आजीने भावाचीच मुलगी सून करून आणली होती. त्यांच्या आजीला एकूण सहा मुले होती. पाच मुलगे आणि एक मुलगी. त्यांची आई माहेरची जनाबाई आणि लग्नानंतरची पार्वती. कृष्णाबाई वर्ष सव्वावर्षाची असतांना वडील वारले आणि पावणे दोन वर्षाच्या कृष्णाला आई देखील सोडून गेली. न कळत्या वयातच त्या पोरक्या झाल्या. करी रोडला त्यांचे काका आणि आजी (वडिलांची आई) राहत असत. करी रोड स्टेशनवरून जो पूल येतो तिथे हाजी कासम चाळ होती. कामगार वर्गासाठी ती प्रसिद्ध चाळ. या परिसराला गिरगावही म्हटलं जायचं. तिथेच त्यांची आजी खानावळ चालवायची. त्यांच्याकडे भांडे घासण्यासाठी मोलकरीण होती. तिला फसवणूकीतून दिवस गेले. म्युनिसिपाल्टीच्या संडासमध्ये ती बाळंतीन होऊन तिथेच बाळाला सोडून निघून गेली. त्यामुळे त्यांच्या आजोबांनी त्या बाळाला घरी आणून त्याचे नाव नारायण तळेकर ठेवले.

घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे कृष्णा शाळेत उशीरा गेली आणि शाळेतील मास्तराने मारल्यामुळे आजीने शाळाच बंद केली. पुढे कृष्णाबाई सावतीन बाईकडे घरकाम करण्यासाठी जाऊ लागली. महिन्याला पाच रूपये मिळायचे. पैसे न देता पैसे साठवून दागिना करण्यासाठी आजीने सांगितले होते. दागिने म्हणजे नथ आणि पुतळ्याचा हार. लालबागमधील जळालेल्या पत्र्याच्या गिरणीमध्ये माती, सिमेंट गोळा करायला कृष्णाबाई जात असे. तिथे चार आणे मिळायचे. जेव्हा आजीला ही गोष्ट कळाली तेव्हा आजी म्हणाली,

*'नको ग बाय तू तिथे जाऊ उनातानात. एक तर तू अशी काळी सावली. मग कोण करणार तुझ्याशी लग्नं? कोण बाय घेऊन जाणार तुला?'*

**प्रेमविवाहाचा क्रांतिकारी निर्णय :**

कृष्णाबाई सुर्वे यांच्या काळातील समाज म्हणजे रूढीपरंपरांच्या ओझ्याखाली जगणारा समाज. कृष्णाबाई सुर्वे तर मराठा कुटुंबातली. कृष्णाबाईला आजीही सोडून गेली. निराधार झालेल्या कृष्णाला आता स्वतः निर्णय घेऊन स्वतःचं संरक्षण करावं लागणार होतं. नारायणाकडे ती सहानुभूतीने पाहायची. नारायण आजारी पडला तेव्हा तिने त्याला पाच रूपये दिले. या अनुभवाबद्दल कृष्णाबाई म्हणते, ''मी गुपचूप आणलेले पाच रुपये मास्तरांना दिले आणि म्हटलं, हे ठेवा माझ्याकडे आता इतकेच आहेत साठवलेले. त्याच क्षणापासून मास्तरांना माझ्याविषयी आपुलकी वाटायला लागली आणि मीही सुखावले.'' आपल्या जीवाभावाचा नारायण असल्याची जाणीव कृष्णाबाईला होती. कृष्णाबाई अशिक्षित असली तरी विचाराने कितीतरी काळाच्या पुढे होती. मास्तराने लग्नाचा निर्णय घेऊन आपल्याला इथून दूर न्यावे असे तिला मनोमन वाटत होते; परंतु काळ आणि परिस्थिती अत्यंत अवघड असल्याने मास्तरांना एकदम निर्णय घेता येत नव्हता. कृष्णाबाई स्वतःच मास्तरांना भेटून जाब विचारते, ''मला जगाची पर्वा नाही. तुम्ही इथून बाहेर पडणार आहात की नाही ते सांगा. नाहीतर तुम्ही वर जिना चढायचा नाही. तुम्ही तुमच्या जागी मी माझ्या जागी सुखी. तुमच्या डोक्यात काही वेगळं असेल तर मला माहित नाही, पण एक सांगते मास्तर, मी जिवंत असेपर्यंत तुमच्या सावलीच्या मागे उभी राहीन. भले मग तुम्ही दुसऱ्या कोणत्याही मुलीशी लग्नं करा, मोठे व्हा, पण तुमची सावली मला हवी आहे आणि लक्षात ठेवा, एका आईबाप नसलेल्या, आजीचं छत्र हरवलेल्या पोरीला तुम्ही तुमची सावली दिली नाही तर मी भुतासारखी तुमच्या मानगुटीवर बसेन.''

धाडसी कृष्णाबाई रेशनकार्ड घेऊन धान्य आणण्याच्या बहाण्याने अनुसया नावाच्या मैत्रिणीस बरोबर घेऊन घराबाहेर पडते आणि मास्तरांच्या बुद्धाजी गोडघाटे नावाच्या मित्राच्या मदतीने कृष्णाबाई आणि मास्तर कोर्टात विवाहबद्ध होतात. कृष्णाबाईच्या काकाच्या सांगण्यावरून मास्तरांवर २४ तासांचं पकड वॉरंट काढण्यात येते. शिवाय सातशे रुपये आणि दोन तोळे सोनं घेऊन पळाली असा आरोप कृष्णाबाई यांच्यावही घेण्यात येतो. तरीही कृष्णाबाई ठाम राहते. विवाहानंतरही फुटपाथवर चहापाव खाऊन मास्तर आणि कृष्णाबाई दिवस काढतात. जेव्हा पहिल्या मुलाचा, रवीचा जन्म झाला तेव्हा खायला सुद्धा अन्न नसल्याचे त्या सांगतात,

*''नजर रस्त्याच्या कडेला ठेवलेल्या पानावर गेली. केळीच्या पानावर अन्न ठेवलेलं होतं. ते गाईसाठी पान होतं की कुणाच्या नावानं वाडी ठेवली होती कोण जाणे. मी पानावरचं अन्न खालं.''*

**मास्तरांचं स्फुर्तिस्थान :**

मास्तरांना महाराष्ट्राचे कवी, चळवळीतले कार्यकर्ते म्हणून जे नावं मिळालं ते केवळ कृष्णाबाई यांनी त्यांना प्रेरित केल्यामुळे. मास्तर म्हणजे नारायण सुर्वे देखील अनाथ मूल. गंगाराम गिरणी कामगाराने त्यांचा सांभाळ केला. नारायणाचेही बालवयात अत्यंत बेहाल झाले हे अगदी लहानपणापासूनच कृष्णाबाई पाहत होत्या. पुढे शिक्षणाधिकारी कपिला खांडवाला यांच्या ऑफिसमध्ये शिपाई म्हणून मास्तरांना नोकरी लागली. त्यावेळी (१९५०) त्यांचा पहिला पगार ६० रुपये होता. मास्तरांनी पुढचं शिक्षण घ्यावं म्हणून कृष्णाबाईचा आग्रह, *''मग तुम्ही का नाही शिकत मास्तर? आता आपला रवीसुद्धा सातवीला गेला. दोघं मिळून एकत्र परीक्षा द्या ना ! तुमचे वाचन, लेखन भरपूर आहे. तुम्हाला काही कठीण जाणार नाही.''*

सातवी पास झाल्यावरही कृष्णाबाई यांनी मास्तरांना डी.एड.चे शिक्षण घेण्यासाठी प्रेरित केले. त्यामुळे मास्तर ६१% घेऊन उत्तीर्ण होऊ शकले. नायगावच्या शाळेत शिक्षक म्हणून रूजू होण्यामध्ये कृष्णाबाईच कारणीभूत ठरल्या. 'ऐसा गा मी ब्रह्म'हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी कृष्णाबाईंनी मंगळसूत्र ५०० रूपयास विकले. १९६३ साली जेव्हा या काव्यसंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. या पुरस्कारामध्ये सन्मानपत्र आणि रोख रक्कम १००० रुपये मिळाले. तेव्हा मास्तरांनी चौदा कॅरेटचं सोन्याचं मंगळसूत्र करून आणल्याची कृतज्ञता कृष्णाबाई व्यक्त करतात.

**निर्भिड आणि स्पष्ट कृष्णाबाई :**

निर्भिडपणा आणि स्पष्टपणा हा कृष्णाबाई यांच्या व्यक्तित्त्वाचा आणखी एक पैलू. त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले. परंतु त्या कधीही निराश झाल्या नाहीत. परिस्थितीशी दोन हात करण्याची हिंमत त्यांच्या व्यक्मितत्त्वामध्ये होती. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्या माघार न घेता त्यातून मार्ग काढण्याची हिंमत त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

जेव्हा मास्तरांबरोबर कृष्णाबाई विवाह करण्यासाठी घराबाहेर पडल्या त्यावेळी त्यांच्या काकांनी सातशे रुपये आणि दोन तोळे सोने घेऊन गेल्याचा खोटा आरोप त्यांच्यावर केला. त्यामुळे पोलीस झडती घेण्यासंबंधी बोलतो. तेव्हा कृष्णाबाई चिडतात,

*''बाईशी बोलताना जरा मर्यादेनं बोला. सत्ता असली म्हणून वाटेल तसं बोलू नका.''*

मास्तरांना आता खूप यश मिळाल्यामुळे त्या निमित्ताने पार्टी होतात. संसाराचं संतुलन बिघडू नये असे कृष्णाबाईंना नेहमी वाटायचे. म्हणून एकदाच त्या मास्तरांना खडसावतात,

''मास्तर, जरा जपून. अशाने संसाराचा खेळखंडोबा व्हायला वेळ लागणार नाही. एवढं नाव, एवढा सन्मान मिळवलाय, एका क्षणात मातीमोल होईल हे विसरू नका. कधी जर तुम्ही अति दारु पिऊन आलात, झोकांड्या जाताना, तोल जाताना मला दिसलात तर मी तुम्हाला घरात घेणार नाही. कितीही दार ठोठावलंत तरी उघडणार नाही.'' गंगाराम सुर्व्याचं निधन होते तेव्हा मास्तर तिथे नसल्यामुळे त्यांचे कर्तव्य पूर्ण करायचे म्हणून मडकं आणि खांदा धरण्यासाठी त्याच पुढे येतात. १९५० मध्ये कृष्णाबाईंनाही शाळेमध्ये शिपायाची नोकरी मिळते. इमानेइतबारे लहान मुलांना स्वच्छ ठेवत असतात. शाळेत एका लहान मुलाने शी केल्यामुळे त्याचे कपडे स्वच्छ धुवून त्यालाही स्वच्छ करतात. तेव्हा हेडमास्तर त्या कवीची पत्नी असल्यामुळे अशी कामे त्यांनी करू नये म्हणून कृष्णाबाईंना सांगतात तेव्हा कृष्णाबाईचं उत्तर,

''गुरुजी, माझी ड्युटी करायला मला लाज वाटत नाही. माझा नवरा कवी असला तरी, तो तिकडे स्टेजवर. घरी तो माझा नवरा असतो आणि मी शाळेत शिपाई असते. कवीची बायको नाही. माझी ड्युटी मी इमानेइतबारे करणार, कारण मी या मुलांच्याच जीवावर पगार घेतेय.'' कृष्णाबाई यांच्या आयुष्यातील असे अनेक प्रसंग आहेत. त्या प्रसंगामधून आजच्या स्त्रियांना बळ मिळते. कृष्णाबाई म्हणजे सामान्यातल्या सामान्य स्त्रीचे उदाहरण. आयुष्याच्या खडतर प्रवासात स्वतःला सावरत आणि पतीला जपत आशावादी दृष्टीने त्या जगल्या. आधुनिक काळात कौटुंबिक हिंसाचार, घटस्फोट, न्यायालय प्रविष्ट प्रकरणे भरपूर दिसून येतात. याचा अर्थ व्यावहारिक ज्ञानापासून स्त्री-पुरुष कोसो दूर आहेत. कृष्णाबाईचं आयुष्य आजच्या स्त्री-पुरुषांनी जाणून घेतल्यास त्यांचे कुटुंबही समृद्ध होईल.

**निष्कर्ष :**

१. अनाथपणाच्या जाणिवेतून कृष्णाबाई आयुष्य जगल्याचे स्पष्ट होते.
२. निर्भिडपणा आणि स्पष्टपणा या कृष्णाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूमुळे त्या प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आल्याचे जाणवते.
३. केवळ शिक्षणामुळेच माणूस परिपूर्ण बनतो असे नाही. अत्यल्प शिक्षण असलेल्या कृष्णाबाई यांनी आयुष्यामध्ये अनेक सकारात्मक निर्णय घेऊन स्वतःचे जीवन इतरांसाठी प्रेरणादायी प्रस्तुत केल्याचे जाणवते.
४. कृष्णाबाईंचा प्रेमविवाह म्हणजे 'न भूतो न भविष्यती!'
५. कृष्णाबाई सुर्वे यांनी आपल्या आयुष्यातील प्रसंग नोंदवत असताना मनाचे संतुलन न जाऊ देता अगदी पारदर्शकपणे आणि तटस्थपणे जीवनातील अनुभव कथन केले आहे.
६. आधुनिक काळातील कौटुंबिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृष्णाबाई सुर्वे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग दिशादर्शक आहेत.

**संदर्भग्रंथ :**

*सुर्वे कृष्णाबाई नारायणा, 'मास्तरांची सावली, डिम्पल पब्लिकेशन, मुंबई*